**मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी**
**यांचेसमोर**

( क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६/७४)

**महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये अर्ज.**

**सहसंचालक**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,घोलेरोड पुणे ... अर्जदार

**विरुध्द**

**कार्यकारी संचालक**
धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स
ॲन्ड कॉमर्स, पुणे ... प्रतिवादी

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ चे कलम ५ व "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४" निर्गमित केले आहेत.

**पूर्वपीठिका**

१. धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस सायन्स ॲन्ड कॉमर्स, पुणे या संस्थेने संगणक शास्त्र या अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इ. ११ वी साठी २२ व शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये १२ वी साठी ४६ विद्यार्थ्यांना अनधिकृत प्रवेश केले आहेत. सबब संस्थेने शासनाची मान्यता नसताना संगणक शास्त्र या अभ्यासक्रमात प्रवेश देऊन महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे.

**सुनावणी**

सदर अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक **०४/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** सुनावणी घेण्यात आली.

२. सुनावणीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते :

- श्रीमती सोनम चौधरी, सहायक संचालक (तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्री. ए. एस. चव्हाण, सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, प्रादेशिक कार्यालय, पुणे
- श्रीमती प्रतिभा प्र. चव्हाण, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे
- श्री. विभाकर तेलोरे, कॅम्पस संचालक, धीरज ज्युनिअर कॉलेज, पुणे

अर्जदार व प्रतिवादी यांनी दिनांक ०४/११/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान तोंडी युक्तिवाद सादर केला. त्यानंतर मा. संचालकांनी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सांगली यांना अधिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेल्या प्रवेश शुल्काबाबत तसेच शिक्षकांच्या नेमणुकांबाबतची माहिती व

पुरावे संकलित करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सदर प्रकरण आदेशासाठी राखून ठेवण्यात आले (Case Closed for Order).

**अर्जदार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचा युक्तिवाद**

३. अर्जदारांनी नमूद केले की :

धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अॅन्ड कॉमर्स, पुणे या संस्थेने त्यांच्या दिनांक १०/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इ. ११ वी साठी २२ व शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये १२ वी साठी ४६ अतिरिक्त प्रवेशास मान्यता देण्याबाबत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे यांचेकडे विनंती केली होती. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ११/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, पुणे यांना याबाबत कळविले.

धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अॅन्ड कॉमर्स, पुणे या संस्थेने महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अधिनियमाचा भंग केलेला असल्याने सदर अधिनियमातील तरतुदीनुसार, सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीकरिता सदर प्रकरण व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २०/१२/२०२४ च्या पत्रान्वये मा.संचालक तथा सक्षम प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात आले.

त्याअनुषंगाने संचालनालयाच्या दिनांक २७/०१/२०२५ च्या आदेशान्वये स्थापित सत्यशोधन समितीने धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अॅन्ड कॉमर्स, पुणे या संस्थेच्या प्राप्त तक्रारीबाबत प्राथमिक चौकशी करुन अहवाल संचालनालयास सादर करणेबाबत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे यांना कळविण्यांत आले होते. त्यानुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे यांच्या दिनांक ३१/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर बाबतचा अहवाल अभिप्रायसह संचालनालयास सादर केला आहे.

धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अॅन्ड कॉमर्स, पुणे या संस्थेने संगणक शास्त्र या अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इ. ११ वी साठी २२ व शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये १२ वी साठी ४६ विद्यार्थ्यांना अनधिकृत प्रवेश केले आहेत.

**प्रतिवादी यांचा युक्तिवाद**

४. प्रतिवादी संस्थेच्या प्राचार्यांनी नमूद केले की -

संस्था प्रमुखांनी शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इ. ११ वी साठी २२ व शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये १२ वी साठी ४६ विद्यार्थ्यांना संगणक शास्त्र या अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना अनधिकृत प्रवेश दिले असल्याचे सांगितले. सदर चूक मान्य असून भविष्यात अशा प्रकारचे अनधिकृत प्रवेश केले जाणार नाहीत अशी हमी देऊन संस्थेच्या प्राचार्यांनी संस्थेवर कमीत कमी शास्ती लादण्यात यावी, अशी विनंती केली.

## निष्कर्ष

सहसंचालक अर्जदार यांचा अहवाल, सत्यशोधन समिती अहवाल, संस्थेचा तोंडी युक्तिवाद, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सांगली अहवाल यांचा विचार करून निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. वरील वस्तूस्थितीचा विचार करता सदर संस्थेने शैक्षणिक सत्र २०२३- २४मध्ये इ. ११ वी साठी २२ व शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये १२ वी साठी ४६ विद्यार्थ्यांना संगणक शास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेश शासनाची कायम स्वरूपाची मान्यता नसताना संगणकशास्त्र या +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना अनधिकृतरित्या प्रवेश दिलेले आहेत.

२. सदर संस्थेतील अधिकचे प्रवेशित विद्यार्थी यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांचे प्रवेश आता रद्द करणे शक्य नाही.

३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे यांनी यांनी त्यांच्या दिनांक ९ जानेवारी २०२६ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेकडून दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार संस्थेने शैक्षणिक सत्र २०२३- २४ व २०२४-२५ साठी प्रतिवर्षी रु. ३५,०००/- इतकी फी विद्यार्थ्यांकडून आकारलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

४. संस्थेने शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ व २०२४-२०२५ मध्ये इ. ११ वी साठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशित विद्यार्थी यादी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पुणे ,यांना प्रमाणित करण्याकरिता सादर केल्या होत्या तथापि, संबंधित संस्थेस संगणक शास्त्र या विषयास शासन मान्यता प्राप्त नसल्यामुळे प्रवेश याद्या प्रमाणित करणेत आल्या नाहीत. तसेच संबंधित संस्थेने शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ मध्ये इ. ११ वी व १२ वी साठी प्रवेश दिलेले नाहीत.

५. प्रतिवादी संस्थेस परिणामांची पूर्व कल्पना असताना देखील संस्थेने विद्यार्थ्यांची दिशाभूल केल्याचे निदर्शनास येत आहे .

६. यावरुन संस्थेने सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० मधील प्रकरण २ कलम ३ मधील करण्यात आलेल्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे.तसेच अधिनियमातील प्रकरण ३ कलम ४ नुसार शास्तीस पात्र आहे.

यास्तव मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१) शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ व २०२४-२०२५ वगळता इतर कोणत्याही शैक्षणिक वर्षात संस्थेने प्रवेश केलेले नाहीत, असे अभिलेखावरून स्पष्ट होते.

२) सदर प्रकरण विलंबाने सादर झाले असल्याने सदर संस्थेतील अधिकचे प्रवेशित विद्यार्थी यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांचे प्रवेश रद्द करणे आजमितीस शक्य नाही.

३) धीरज ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस सायन्स ॲन्ड कॉमर्स,पुणे या संस्थेला रू.५,००,०००/-(रू.पाच लाख फक्त) एवढी शास्ती लादण्यांत येत आहे

४) प्रस्तूत निर्णय सर्व संबंधितांना कळविण्यांत यावे.

या सुनावणी आदेशाबाबत संस्थेस अपील करावयाचे असल्यास अधिनियमातील कलम ७ अन्वये नियुक्त अपिलिय अधिकारी, सहसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांचेकडे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपिल करता येईल .

स्थळ – मुंबई

दिनांक – 27/02/2026.

(माधवी सरदेशमुख)(भा.प्र.से)

( संचालक )

प्रत माहितीकरिता -

१) सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशि. प्रा. का. पुणे.

२) जि. व्य. शि. व प्रशि. अधिकारी, जि. व्य. शि. व प्रशि. कार्या. पुणे.

३) धीरज ज्यु. कॉ. ऑफ आर्ट्स, सायन्स ॲन्ड कॉमर्स, पुणे. (जि. व्य. शि. व प्रशि. कार्या. पुणे यांचे मार्फत).

४) निवडनस्ती - (ला. क्र. ०५)